निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
०५ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३६६ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे




# प्रशासनाच्या नाकाखाली भ्रष्टाचाराचा 'धनादेश'!

## परतूर मतदारसंघात ९९ लाखांचा रस्ते घोटाळा?

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) विभाग क्र. २ अंतर्गत येणाऱ्या परतूर मतदारसंघात एक खळबळजनक घोटाळा समोर आला आहे. कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष काम न करता तब्बल ९९ लाख रुपयांचे (९९,००,०००/-) धनादेश उचलण्यात आल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते विजय यादव लोणीकर यांनी केला आहे. या भ्रष्टाचाराविरोधात लोणीकर यांनी आता प्रशासनाविरुद्ध एल्गार पुकारत आमरण उपोषण सुरू केले आहे.

> पाच वर्षे झाली तरी प्रशासन झोपलेले आहे. जनतेच्या कराचा पैसा असा हडप होऊ देणार नाही. जोपर्यंत दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत मी उपोषणावरून मागे हटणार नाही!
> **- विजय लोणीकर,उपोषणकर्ते**

**कागदावर रस्ते, प्रत्यक्षात फक्त झाडेझुडपे!**

मिळालेल्या माहितीनुसार, सन २०१९ ते २०२२ या कालावधीत परतूर मतदारसंघातील ३०५४, २५१५ आणि ५०५४ या लेखाशीर्ष (क्शरवी) अंतर्गत विविध कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. विजय लोणीकर यांचा आरोप आहे की, ही कामे प्रत्यक्षात जमिनीवर झालीच नाहीत. मात्र, विभागाने कागदोपत्री सर्व प्रक्रिया पूर्ण दाखवून लाखो रुपयांची देयके लाटली आहेत. पुरावा म्हणून सादर करण्यात आलेल्या फोटोंमध्ये रस्त्यांऐवजी केवळ काटेरी झाडे आणि ओसाड जमीन दिसत आहे.

**प्रशासनाची 'अर्थपूर्ण' शांतता?**

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, भ्रष्टाचाराची तक्रार देऊन पाच वर्षे उलटली तरी अद्याप कोणतीही ठोस चौकशी झालेली नाही.वरिष्ठांचे आदेश धाब्यावर: अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी ६ जुलै २०२३ रोजीच या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते. दोन वर्षांपासून अहवाल बेपत्ता: कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग जालना नं. २ यांना अहवाल सादर करण्यास सांगितले



होते, मात्र दोन वर्षे उलटूनही हा अहवाल सादर करण्यात आला नाही.

थातूर-मातूर चौकशीचा बनाव: उपोषणकर्त्यांच्या मते, जेव्हा उपोषणाची तारीख जवळ आली, तेव्हा प्रशासनाने घाईघाईत एक दिशाभूल करणारा अहवाल तयार केला, जो उपोषणकर्त्यांनी फेटाळून लावला आहे.दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणीविजय लोणीकर यांनी या भ्रष्टाचारात सामील असलेल्या अधिकाऱ्यांवर थेट निशाणा साधला आहे. यामध्ये बी. बी. ठोंबरे (उपविभागीय अभियंता) बी. डी. म्हस्के (तत्कालीन शाखा अभियंता, परतूर) यांच्यासह संबंधित कंत्राटदार आणि संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

सद्यस्थितीसध्या विजय लोणीकर हे जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना यापूर्वीच या आंदोलनाची रीतसर सूचना देण्यात आली आहे. आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष याकडे लागले आहे की, झथऊ चे वरिष्ठ अधिकारी या '**करोडोच्या**' घोटाळ्यावर काय पावले उचलतात की भ्रष्टाचाराला पाठीशी घालतात?







# पशुसंवर्धन विभागात मेगाभरतीची लाट: पुढील अधिवेशनापर्यंत रिक्त पदे भरणार - मंत्री पंकजा मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी आणि पशुसंवर्धन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू असून, पुढील अधिवेशनापर्यंत ही प्रक्रिया मोठ्या प्रमाणात मार्गी लागेल, असा ठाम विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत व्यक्त केला.विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

**महत्त्वाचे मुद्देः पदभरतीचा लेखाजोखा**

पशुसंवर्धन विभागातील कामकाजात पारदर्शकता आणि गती आणण्यासाठी सरकारकडून खालील पावले उचलण्यात आली आहेत:

नवीन आकृतीबंधास मंजुरी: ऑक्टोबर २०२४ मध्ये पशुसंवर्धन विभागाचा नवीन आकृतीबंध मंजूर झाला आहे. यामुळे अनेक संवर्गातील पदसंख्या वाढली असून प्रशासकीय कामकाजाला बळकटी मिळणार आहे.

**MPSC कडून जाहिराती प्रसिद्धः**



डऊज (पशुवैद्यकीय विकास अधिकारी): २५ एप्रिल २०२५ रोजी या पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सहाय्यक आयुक्त (वर्ग-१): १२ ऑगस्ट रोजी सहा सहाय्यक आयुक्त पदांची जाहिरात काढण्यात आली आहे.

जिल्हा परिषद स्तरावरील भरती: पशुपर्यवेक्षकांची पदे जिल्हा परिषदेमार्फत भरली जाणार असून, त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाशी (GAD) सविस्तर चर्चा पूर्ण झाली आहे.

**परीक्षेचे नियोजन आणि सद्यस्थिती**

मंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले की, एमपीएससी (चझडउ) सोबत शासन सातत्याने पत्रव्यवहार करत आहे. परीक्षेच्या तांत्रिक बाबींबाबत त्यांनी खालील माहिती दिली.पेपर सेटिंग प्रक्रिया: परीक्षेसाठी तज्ज्ञ अधिकारी आणि प्राध्यापकांची नियुक्ती करणे आवश्यक असते. ही प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष परीक्षांचे आयोजन केले जाईल.MPSC चे आश्वासन: भरती प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन आयोगाकडून प्राप्त झाले आहे.वेळेचे नियोजन: नवीन आकृतीबंधानुसार वाढलेली पदे भरणे अनिवार्य असून, पुढील अधिवेशनापूर्वी जास्तीत जास्त पदे भरण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

> राज्यातील पशुधनाचे संगोपन आणि शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सेवा अधिक सक्षम करण्यासाठी ही पदभरती अपरिहार्य आहे. आम्ही प्रक्रियेतील अडथळे दूर करत असून लवकरच नवीन नियुक्ती होतील.
> **- पंकजा मुंडे, पशुसंवर्धन मंत्री**

# 'पार्थ' हरपला, आता विलीनीकरणाचा 'अध्याय' संपला!

**महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या 'विलीनीकरणाच्या' हायव्होल्टेज ड्रामावर जयंत पाटील यांनी अखेर पडदा टाकला आहे. पण हा पडदा टाकताना त्यांनी जे विधान केलं, ते केवळ राजकीय स्पष्टीकरण नसून एका मोठ्या सत्तासंघर्षाचा 'अंत' असल्याचं अधोरेखित करतंय. ज्यांच्यासोबत चर्चा सुरू होती, ते नेते आता हयात नाहीत, हे जयंत पाटलांचं वाक्य अजित पवार यांच्या निधनानंतर बदललेल्या राजकीय वास्तवावर शिक्कामोर्तब करणारं ठरलं आहे.**

**अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत विलीनीकरणाच्या हालचाली सुरू होत्या, अशा वावड्या उठत होत्या. खुद्द अजितदादांची ही इच्छा होती, असा दावा शरद पवार गटाकडून केला जात होता. मात्र, आता जयंत पाटलांनी अत्यंत रोखठोकपणे सांगितलं आहे की, विलीनीकरणाची चर्चा आता पूर्णपणे थांबली आहे.**

**नेतृत्वाचा अभावः अजित पवारांसारखा कणखर नेता नसल्यामुळे आता शरद पवार गटाला विलीनीकरणाची गरज उरलेली नाही.**

**अस्तित्वाची लढाईः अजित पवार गट (सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील) आणि शरद पवार गट आता स्वतंत्रपणे आपली ताकद अजमावतील, हे स्पष्ट झालं आहे.**

**जयंत पाटलांनी केवळ विलीनीकरणावरच भाष्य केलं नाही, तर राज्यसभेच्या जागेवरूनही महाविकास आघाडीची (चत-) पुढची दिशा स्पष्ट केली आहे. शरद पवार यांनी पुन्हा एकदा दिल्लीत जावं, ही त्यांच्या पक्षाची भूमिका महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवारांचं महत्त्व आजही किती अबाधित आहे, हेच दर्शवते.**

**उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याशी होणारी चर्चा आणि 'एकत्रित निर्णय' घेण्याची भाषा, ही आगामी निवडणुकांसाठी मविआची वज्रमूठ कायम असल्याचा संकेत देते. मात्र, शरद पवारांसारख्या भीष्म पितामहाने पुन्हा सक्रिय संसदेत जाणं, हे भाजपविरोधी मोहिमेला धार चढवणारं ठरेल.**

**अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी 'विलीनीकरणाचा' जो सोपा मार्ग शोधला जात होता, त्याला जयंत पाटलांनी सुरुंग लावला आहे. आता प्रश्न उरतो तो अजित पवार गटाच्या अस्तित्वाचा. ज्या विलीनीकरणाची स्वप्नं खुद्द दादांनी पाहिली होती (असा दावा केला जातोय), ती स्वप्नं आता त्यांच्यासोबतच विरून गेली आहेत का?**

**स्पष्ट आहे की, महाराष्ट्राच्या राजकारणात आता सहानुभूतीपेक्षा संघर्षाला जास्त महत्त्व येणार आहे. शरद पवार गट आता विलीनीकरणाच्या कुबड्या न शोधता, स्वतःच्या हिंमतीवर मैदानात उतरणार, हे जयंत पाटलांच्या शब्दांवरून स्पष्ट झालंय.**

# लोकनेते, विकासाचा ध्यास असलेले जननायकः आमदार नारायणभाऊ कुचे

५ मार्च हा दिवस बदनापूर-अंबड विधानसभा मतदारसंघासाठी अत्यंत उत्साहाचा दिवस आहे.

या मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, सामान्यांचे आधारस्तंभ आणि विकासाचे महामेरू श्री. नारायणभाऊ कुचे यांचा आज वाढदिवस. एक सामान्य कार्यकर्ता ते लोकप्रिय आमदार असा त्यांचा प्रवास हा थक्क करणारा आणि संघर्षातून यशाकडे नेणारा प्रेरणादायी प्रवास आहे.

**एक झंझावाती राजकीय प्रवास**

नारायणभाऊंची राजकीय कारकीर्द ही भारतीय जनता पार्टीच्या मुशीतून घडलेली आहे. एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून त्यांनी सुरुवातीच्या काळात मुकुंदवाडी (छत्रपती संभाजीनगर) येथे काम केले. त्यांच्यातील नेतृत्वगुण आणि जनसंपर्क पाहून त्यांना नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. आपल्या कामाच्या जोरावर त्यांनी औरंगाबाद महानगरपालिकेचे सभापती पद देखील भूषवले. स्थानिक स्वराज्य संस्थेतील हा अनुभव पाठीशी घेऊन, आज ते बदनापूर-अंबड मतदारसंघाचे यशस्वी नेतृत्व करत आहेत.

**बदनापूर-अंबड मतदारसंघाचा कायापालट**

आमदार झाल्यापासून नारायणभाऊंनी मतदारसंघाच्या विकासाची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि बघता बघता मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलला.



रस्ते विकास: मतदारसंघातील प्रत्येक गावाला मुख्य रस्त्याशी जोडण्याचे स्वप्न त्यांनी पूर्णत्वाकडे नेले आहे. रस्ते ही प्रगतीची वाहिनी आहे, हे ओळखून त्यांनी रस्ते बांधणीवर विशेष भर दिला.

शुद्ध पिण्याचे पाणी: 'प्रत्येक घराला शुद्ध पाणी' हे केवळ ब्रीदवाक्य न ठेवता, त्यांनी अनेक गावांमध्ये पाणी पुरवठा योजना राबवून महिलांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवली आहे.

**शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा बुलंद आवाज**

विधानसभेत नारायणभाऊंची ओळख एक आक्रमक आणि अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून आहे. शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या प्रश्नावर ते नेहमीच हिरीरीने बोलतात. केवळ बोलून न थांबता, गरज पडल्यास आपल्याच सरकारकडे जनतेच्या न्याय्य हक्कासाठी ते लढा द्यायला मागे-पुढे पाहत नाहीत. जनतेचे हित हेच त्यांच्यासाठी सर्वतोपरी आहे.

**कार्यकर्त्यांचे कुटुंबप्रमुख**

नारायणभाऊ केवळ आमदार नाहीत, तर ते कार्यकर्त्यांसाठी एक कुटुंबप्रमुख आहेत. कार्यकर्त्यावर अडचण आली की, भाऊ तिथे धावून जातात. संघटना वाढवण्याचे कौशल्य आणि नवीन माणसे जोडण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे आणि पाठबळ देण्याच्या वृत्तीमुळे आज मतदारसंघात कार्यकर्त्यांची मोठी फौज उभी राहिली आहे.

**भविष्याची वाटचालः 'मंत्री' म्हणून पाहण्याची लोकइच्छा**

आज बदनापूर-अंबड मतदारसंघातील प्रत्येक कार्यकर्त्याची आणि जनतेची एकच भावना आहे की, विकासाचा हा झंझावात असाच सुरू राहावा. नारायणभाऊंच्या कार्यक्षमतेचा उपयोग राज्याच्या विकासासाठी व्हावा आणि येणाऱ्या काळात ते 'मंत्री' म्हणून शपथ घेताना आम्हाला दिसावेत, हीच आमची मनोकामना आहे.

अशा या लोकप्रीय, कार्यसम्राट आणि अजातशत्रू नेतृत्वास वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!

**– विशेष लेख**
**श्री. अवधूत रामराव खडके (नाना)**
**(सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती अंबड)**

# कडक उन्हात चिमुकल्या सय्यद उमेदने पूर्ण केला आयुष्यातील पहिला 'रोझा'

**कौतुक!**

**गेवराई/प्रतिनिधी (शेख हमीद)**/ पवित्र रमजान महिन्याला उत्साहात सुरुवात झाली असून, मुस्लिम बांधव मोठ्या श्रद्धेने उपवास (रोझे) करत आहेत. वाढत्या उन्हाचा कडाका आणि वातावरणातील उष्णता अशा आव्हानात्मक परिस्थितीतही गेवराई येथील चिमुकल्या सय्यद उमेद सय्यद सिराज अहमद याने आपल्या आयुष्यातील पहिला रोझा अत्यंत यशस्वीपणे पूर्ण केला आहे. त्याच्या या जिद्दीचे आणि धैर्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



**भल्या पहाटेपासून सायंकाळपर्यंत कडक शिस्त**

सोमवार, दिनांक २ मार्च २०२६ रोजी सय्यद उमेदने आपला पहिला उपवास धरला. वयाने लहान असूनही उमेदने पहाटेच्या 'सहरी'पासून (उपवास धरण्यापूर्वीचे अन्न) ते सायंकाळच्या 'इफ्तार'पर्यंत (उपवास सोडण्याची वेळ) अन्नाचा कण किंवा पाण्याचा थेंबही न घेता आपला संयम कायम ठेवला. सध्या मार्च महिन्याची सुरुवात असल्याने उन्हाची तीव्रता अधिक आहे, तरीही या कडक उन्हात न डगमगता त्याने आपला संकल्प पूर्ण केला.

**सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव**

उमेदने दाखवलेल्या या धार्मिक चिकाटीमुळे सय्यद परिवारासह नातेवाईकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्याच्या या यशाबद्दल सय्यद आणि खान परिवार ,शेख परिवार,माजलगाव येथील मामा: हबीब पठाण, असलम पठाण, तौफीक शेख आणि हमीद शेख,या सर्वांनी उमेदचे विशेष कौतुक केले असून त्याला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एका लहान मुलाने एवढ्या कडक उन्हात दाखवलेला हा संयम अनेकांसाठी प्रेरणेचा विषय ठरला आहे.

# बीडमध्ये समाजसेवेचा महाकुंभ! 'रयत'च्या १६ व्या पुरस्कार सोहळ्याचा दिमाखदार सोहळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी**/सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील दिग्गजांचा गौरव; मान्यवरांच्या उपस्थितीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृह दुमदुमले

बीड । विशेष प्रतिनिधी केवळ पुरस्कार देणे म्हणजे सोहळा नव्हे, तर समाजघटकांच्या कष्टाची दखल घेऊन त्यांना उभारी देणे हाच खरा 'रयत'चा धर्म आहे, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. सामाजिक, सांस्कृतिक आणि कला क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या ध्येयवेड्यांचा गौरव करण्यासाठी रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६ वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ऐतिहासिक थाटात पार पडला. रयतच्या या व्यासपीठावरून समाजसेवेची नवी मशाल पेटवण्यात आली.

नियोजनबद्धता आणि महिलाशक्तीचा आविष्कार

हा संपूर्ण सोहळा प्रतिष्ठानच्या मार्गदर्शिका रोहिणीताई गणेश माने यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडला. विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या यशाची संपूर्ण धुरा प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना माने व शुभांगी माने यांनी आपल्या खांद्यावर घेतली होती. त्यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे आणि सूक्ष्म नियोजनामुळे आलेल्या प्रत्येक पाहुण्याला कार्यक्रमात चैतन्याचा अनुभव आला. महिला नेतृत्वाने आखलेले हे नियोजन सर्वत्र कौतुकाचा विषय ठरले.

**राजेश दादा खर्डेंची 'एन्ट्री' आणि मान्यवरांची मांदियाळी**

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते राजेश दादा खर्डे (वेसावकर) यांची उपस्थिती. त्यांनी आपल्या पारंपरिक कोळी वेशात सभागृहात प्रवेश करताच प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांच्या या 'दमदार एन्ट्री'ने सोहळ्याची रंगत अधिकच वाढवली.यावेळी व्यासपीठावर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा द्रौपताबाई पठारे, ज्येष्ठ समाजसेवक कैलास दादा पठारे, विठ्ठल मूर्तीवार, मंजू ताई पठारे, अक्षय कलाकार, बंडोपंत सोळुंके, चित्रपट मंडळाचे प्रशांत होर्शीळ सर, समाजसेवक सुशीलजी खटोड, एम.एस. कन्स्ट्रक्शनचे संचालक साथीराम अण्णा ढोले, ओबीसी फाउंडेशनचे लक्ष्मण लटपटे आणि संतोष अवताडे (अहिल्यानगर) अशा मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच सोशल मीडियावरील लोकप्रिय चेहरे लखन चव्हाण, ओम पावले आणि खंडू तात्या यांना पाहण्यासाठी तरुणाईने मोठी गर्दी केली होती.

कर्तृत्वाचा यथोचित गौरव

ज्यांनी समाजासाठी घाम गाळला, अशा रत्नांचा शोध घेऊन त्यांना या सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र स्वीकारताना अनेक मान्यवरांचे डोळे पाणावले होते. सन्मानितांमध्ये प्रामुख्यानेप्रमोद रामदासी, लक्ष्मीकांत रुईकर,आदिम राज बहुउद्देशीय संस्था (रामू मोते),सुशील हरिभाऊ कोळेकर, गोवर्धन दराडे (पसायदान सेवा केंद्र),सरोज आनंदकर (नागपूर), संगीता माने (मुंबई क्राईम ब्रँच),प्रमोद चांदणे, प्राची चांदणी, देविदास शेलार, नयना कानडे,या सर्वांनी आपल्या भावना व्यक्त करताना, हा पुरस्कार आमची जबाबदारी वाढवणारा आहे, असा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी आपल्या बहारदार शैलीत केले, ज्यामुळे प्रेक्षक शेवटपर्यंत खुर्चीला खिळून राहिले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी गणेश माने, किशोर कुलकर्णी, प्रकाश देवा, जाकीर भाई, विकास धोत्रे, गुड्ड्या जोगदंड, महादेव सवाई, मीनाक्षी देवकते, नयना भाकरे आणि नेहा साबळे या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.रयत सामाजिक प्रतिष्ठानने आयोजित केलेला हा १६ वा सोहळा केवळ एक कार्यक्रम न ठरता, तो बीडच्या सामाजिक इतिहासातील एक प्रेरणादायी अध्याय ठरला आहे.



# परतूर तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानाचा जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी)** महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार महसूल प्रशासन अधिक लोकभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' (टप्पा क्र. १) अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत जिल्हाधिकारी मित्तल यांनी परतूर तालुक्यातील लोणी, आष्टी आणि कऱ्हाळा या गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला व प्रशासकीय कामांचा आढावा घेतला.

प्रशासनाचा 'दारी' जाऊन प्रश्न सोडवण्याचा संकल्प

ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, महिला आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन समस्यांचे जागेवरच निराकरण व्हावे, या उद्देशाने हे अभियान राबवण्यात येत आहे. जिल्हाधिकारी मित्तल यांनी या भेटीदरम्यान महसूल विभागाच्या विविध सेवांची पाहणी केली आणि प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

शिबिराचे मुख्य उद्दिष्ट आणि उपलब्ध सुविधा:

या समाधान शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना खालील सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जात आहेत:

**महसूल कामकाजः** प्रलंबित व विवादग्रस्त फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती आणि अकृषिक (NA) जमिनीबाबतच्या सुधारणा.

**डिजिटल सेवाः** डिजिटल सात-बारा उपलब्ध करून देणे आणि ई-मोजणी प्रक्रियेला गती देणे.

**एक खिडकी योजनाः** लोकसेवा हक्क अधिनियमानुसार विविध प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकारण्यासाठी 'एक खिडकी' सुविधा व हेल्प डेस्कची स्थापना.

**शेतकरी योजनाः** 'ग्रीस्टॅक' आणि 'पी.एम. किसान' योजनेशी संबंधित तक्रारींचे निवारण.

**जनजागृतीः** नवीन महसूल तरतुदींबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे.



**मार्च ते मे पर्यंत चालणार अभियान**

हे अभियान केवळ एका दिवसापुरते मर्यादित नसून, मार्च ते मे या कालावधीत संपूर्ण तालुक्यात टप्प्याटप्प्याने राबविले जाणार आहे. तालुका स्तरावर या कामावर लक्ष ठेवण्यासाठी विशेष सनियंत्रण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणणे हा या शिबिराचा मुख्य हेतू आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित कामांसाठी आणि शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी या शिबिरांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी मित्तल यांनी यावेळी केले.या प्रसंगी महसूल विभागाचे विविध अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# जालना महानगरपालिकाः सदस्य निवडीवरून काँग्रेसमध्ये फूट? किरण खानापुरे समर्थकांचा आक्रमक पवित्रा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/ जालना महानगरपालिकेत सत्तेची गणिते जुळवत असतानाच काँग्रेस पक्षामध्ये अंतर्गत वादाचा स्फोट झाला आहे. पक्ष संघटनेतील जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय नसल्याचे चित्र समोर आले असून, किरण खानापुरे यांच्या समर्थकांनी घेतलेल्या भूमिकेमुळे शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.



वादाचे मुख्य कारण काय?

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुका किंवा संघटनात्मक फेरबदलाच्या हालचाली सुरू असताना, निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलले जात असल्याचा आरोप खानापुरे गटाकडून केला जात आहे. सदस्यांच्या नावांची निश्चिती करताना पारदर्शकता नसल्याने आणि काही ठराविक नेत्यांच्या मनमानी कारभारामुळे हा गोंधळ निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

नेतृत्वाबद्दल नाराजी: पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी घेतलेल्या काही निर्णयांविरुद्ध कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे.किरण खानापुरे यांची भूमिका: पक्षासाठी वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी किरण खानापुरे यांनी लावून धरली आहे. त्यांच्या या भूमिकेला अनेक तरुण कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळत आहे.

गोंधळाचे स्वरूप: नुकत्याच झालेल्या एका बैठकीत सदस्यांच्या नावावरून शाब्दिक चकमक झाली आणि बैठकीचे रूपांतर गोंधळात झाले.

जालन्यात काँग्रेस हा एक महत्त्वाचा पक्ष आहे, मात्र अशा प्रकारे अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याने आगामी महानगरपालिका निवडणुकीत पक्षाला याचा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जर वरिष्ठ नेत्यांनी वेळीच हस्तक्षेप करून किरण खानापुरे आणि इतर नाराज गटाची समजूत काढली नाही, तर पक्षात मोठी गळती होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.पक्षासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला जर किंमत मिळणार नसेल, तर आम्ही आमचा आवाज बुलंद करू, अशी भावना खानापुरे समर्थकांनी व्यक्त केली आहे.

# सोयगाव जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी फुंकले सामाजिक परिवर्तनाचे तुतारी; 'द्वेष-मत्सराचे' केले होळीत दहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव /प्रतिनिधी**/होळी म्हणजे केवळ लाकडे जाळून आनंद साजरा करणे नव्हे, तर मनातील वाईट विचारांचा त्याग करून सद्गुणांचा स्वीकार करणे होय, हाच संदेश सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी दिला आहे. या शाळेत विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ करून गोळा केलेल्या कचऱ्याची होळी पेटवली आणि त्यामध्ये द्वेष, मत्सर, क्रोध, आळस आणि संताप यांसारख्या विघातक वृत्तींचे प्रतीकात्मक दहन करून एक आगळावेगळा उपक्रम राबवला.

**प्रदूषणमुक्त आणि संस्कारक्षम होळी**

पारंपारिक होळीला फाटा देत विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात असलेला कचरा जमा केला. त्याची होळी रचून त्यावर मानवी प्रगतीत अडथळा ठरणाऱ्या दुर्गुणांचे फलक लावले होते. 'आळसाचा त्याग करा', 'क्रोध सोडा' अशा घोषणा देत या अनिष्ट प्रवृत्तींचे दहन करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक स्वच्छतेसोबतच मानसिक स्वच्छतेचा संदेशही देण्यात आला.

**घेतली 'सद्गुणांची' शपथ**

होळी दहनानंतर सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येत आयुष्यभर प्रामाणिकपणा, जिद्दीने अभ्यास आणि स्वच्छतेचा आग्रह धरण्याची शपथ घेतली. आगामी धुलीवंदनासाठी रासायनिक रंगांचा वापर न करता केवळ नैसर्गिक रंगांचा वापर करून पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विद्यार्थ्यांनी धुलीवंदनाच्या गीतांवर ठेका धरत मनसोक्त नृत्य केले. एकमेकांना नैसर्गिक रंग लावून आनंदाची उधळण करण्यात आली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या या आनंदात सहभागी होऊन त्यांना सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे महत्त्व पटवून दिले.या स्तुत्य उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी शिक्षकवृंदातू सुरेखा चौधरी, पंकज रगडे, रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे, सवीता पाटील, प्रतिभा कोळी,गणेश बाविस्कर, अनिल देसाई, विवेक महाजन आणि शुभम देसले यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सोयगाव परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.



खाकीची गुंडगिरी!

# बिल मागितले म्हणून पोलिसाचा हॉटेलमध्ये थरार; चाकू हल्ल्यात चौघे रक्ताच्या थारोळ्यात!

**आत्ताच एक्सप्रेस**

**संभाजीनगर (विशेष प्रतिनिधी)** ज्यांच्या खांद्यावर कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे, त्याच पोलीस दलातील एका कर्मचाऱ्याने नशेच्या आणि सत्तेच्या धुंदीत माणुसकीला काळिमा फासल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. धुळे-सोलापूर महामार्गावरील पिंपळगाव (पांढरी) शिवारात असलेल्या 'हॉटेल कार्तिक'मध्ये जेवणाच्या आणि दारूच्या बिलावरून झालेल्या वादातून पोलीस कर्मचारी नितेश जाधव याने आपल्या साथीदारांसह हॉटेल मालक आणि कर्मचाऱ्यांवर प्राणघातक चाकू हल्ला केला. या रक्तरंजित संघर्षात चौघे जण गंभीर जखमी झाले असून, संभाजीनगर पोलीस दलाच्या प्रतिमेला या घटनेमुळे मोठा तडा गेला आहे.

**संभाजीनगर मध्ये 'रक्षकच बनला भक्षक'; पिंपळगाव (पांढरी) येथील हॉटेल कार्तिकमधील धक्कादायक प्रकार!**

धुलिवंदनाच्या दिवशी दुपारी तीनच्या सुमारास पोलीस कर्मचारी नितेश जाधव हा आपल्या तीन मित्रांसह हॉटेल कार्तिकमध्ये मद्यपान आणि जेवणासाठी गेला होता. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या या कर्मचाऱ्याला हॉटेलचे बिल देण्यात आले. मात्र, 'बिल जास्त झाले' असे म्हणत जाधवने हुज्जत घालण्यास सुरुवात केली. कर्मचाऱ्यांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता, पोलीस असल्याची मस्ती दाखवत त्याने शिवीगाळ सुरू केली.




**चाकूने सपासप वार; हॉटेलमध्ये रक्ताचा सडा!**

वादाचे रूपांतर हाणामारीत होताच, नितेश जाधवने आपल्याकडे असलेला चाकू काढून हॉटेल मालक आणि कर्मचाऱ्यांवर सपासप वार करण्यास सुरुवात केली. हा हल्ला इतका भीषण होता की, हॉटेल मालकासह कर्मचारी रक्ताच्या थारोळ्यात पडले. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या इतरांनाही त्याने सोडले नाही. या हल्ल्यात एकूण चौघे जण जखमी झाले असून, दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. जखमींवर सध्या एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**पोलिसांवरच गुन्हा दाखल करण्याची नामुष्की**

घटनेची माहिती मिळताच करमाड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राजपूत यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर या कृत्यातील क्रूरता स्पष्ट झाली. यानंतर, करमाड पोलिसांनी तातडीने पावले उचलत आरोपी पोलीस कर्मचारी नितेश जाधव आणि त्याच्या तीन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सामान्य माणसाने कायद्याचे उल्लंघन केले तर पोलीस त्याला बेदम चोप देतात, मग आता स्वतः पोलिसानेच भरदिवसा चाकूने लोकांचा गळा चिरण्याचा प्रयत्न केला आहे, तर अशा गुंड प्रवृत्तीच्या पोलिसाला बडतर्फ करून कठोर शिक्षा होणार का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

**खाकीला लागला कलंक!**

जिल्ह्यात धुलिवंदनाचा सण शांततेत साजरा करण्याचे आवाहन पोलीस करत असताना, दुसरीकडे पोलीसच रक्ताची होळी खेळत असल्याने खळबळ उडाली आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, संबंधित कर्मचाऱ्यावर विभागीय कारवाईचे आणि निलंबनाचे संकेत दिले आहेत. मात्र, या घटनेमुळे सर्वसामान्यांमध्ये भीतीचे आणि संतापाचे वातावरण आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिक

( उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग )

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये

जा.क्र.मनपा/वृ.प्रा./२०२६/१२७० दिनांक:- ०२.०३.२०१६

## जाहिर प्रगटन

या जाहिर प्रगटनाद्वारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, वृक्षप्राधिकरण विभागाकडे वृक्ष तोडणेकरिता वरील नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये खालील अर्ज प्राप्त झालेले आहेत. ज्याअर्थी वृक्षप्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवुन आक्षेप मागविण्याचे सुचित केलेले आहे.

त्याअनुषंगाने अधिनिमयातील अटी व शर्तीस अधिन राहुन प्राप्त अर्जानुसार पाहणी करुन प्रस्ताव तयार केलेले आहेत. सदरचे प्रस्ताव उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, सिध्दार्थ उद्यान मध्यवर्ती बसस्थानक जवळ येथे उपलब्ध असुन प्रस्तुत प्रकरणी आक्षेप तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन सात (०७) दिवसांच्या मुदतीत द्याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र | अर्जदाराचे नाव व ठिकाण | वृक्ष तोडण्याचे कारण | वृक्षाच्या प्रजाती व संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. अमरदिपसिंग प्रितमसिंग छाबडा, पानदरिबा, ४-१-७०, गुलजार टॉकिज | नमुद वृक्षाजवळ विद्युत रोहित्र व विद्युत वाहक तारा असुन पार्किंग होवुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वृक्ष भिंतीमध्ये उगवलेले असल्याने तोडणेस. | उंबर-०१ |
| ०२ | श्री. कल्याण भानुदासराव तुपे, नगरभुमाण क्र.२९६४/१, प्लॉट नं.५-५-७८, पेंडकर हॉस्पीटल जवळ, खडकेश्वर | नमुद वृक्ष संरक्षक भिंतीस तसेच प्रवेशद्वारास अडथळा निर्माण करत असल्याने तोडणेस. | नारळ-०२ |
| ०३ | अपर जिल्हाधिकारी तथा संचालक, मराठवाडा महसुल प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर. | नमुद सप्तपर्णी-०१ वृक्ष ड्रेनेज लाईनला अडथळा निर्माण करत असल्याने तोडणेस तसेच निलगिरी-०१ वृक्ष एका बाजुला झुकलेले असल्याने उंची कमी करणेस. | सप्तपर्णी-०१ वृक्ष तोडणेस निलगिरी-०१ वृक्षाची उंची कमी करणेस. |
| ०४ | श्री. विशाल सुदाम हिवाळे, घर क्र.२२/१०, मुकुंदवाडी, एन-२ सिडको | नमुद वृक्षाच्या बुंध्यास किड लागलेली आहे. वृक्ष धोकादायक असुन असल्याने तांत्रिक दृष्ट्या प्रत्यारोपण करणे शक्य नसल्याने तोडणेस. | उंबर-०१ |
| ०५ | श्री. शशिकांत काशिनाथ पाटील, रो-हाऊस नं.ए-३, द्वारकापुरी, एकनाथनगर, उस्मानपुरा | नमुद वृक्ष पाण्याच्या हौदास तसेच संरक्षक भिंतीस बाधित असल्याने तोडणेस. | ग्लिरीसिडीया-०१ , पारिजातक-०१ |
| ०६ | श्री. मुकेश द्वारकाधीश गर्ग, १९, कल्पना हाऊसिंग सोसायटी, बन्सीलालनगर | नमुद वृक्ष प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने तोडणेस. | अशोका-०३ , गुलमोहर-०१ |
| ०७ | श्री. चेतन लालवाणी व इतर-०२, प्लॉट नं.५६, ज्योतिनगर, दशमेशनगर | नमुद वृक्ष बांधकामात बाधित होत असल्याने तोडणेस. | गुलमोहर-०१ |
| ०८ | श्री. विपीन कुमार (कार्यालय प्रमुख), एन.एस.ओ.भवन, एन-७, सिडको | सुबाभुळ-०१ वृक्ष कार्यालय पसिरात असुन जिर्ण व धोकादायक असल्याने तोडणेस.<br>पिंपळ ०१ वृक्ष कार्यालयासमोरील ध्वज पोलला बाधित असुन तांत्रिक दृष्ट्या प्रत्यारोपण करणे शक्य नसल्याने तोडणेस.<br>नमुद वृक्षाचा विस्तार इमारतीस बाधित असल्याने फांद्या छाटणेस | सुबाभुळ-०१ वृक्ष तोडणेस<br>पिंपळ-०१<br>कड्डुलिंब-०२,पिंपळ-०१ निलगिरी-०१,शिरस-०१ |

**स्वाक्षरीत/-**
**वृक्ष अधिकारी**
**महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर**

# कन्नड शहरवासीयांनी अडीअडचणींबाबत निसंकोच संपर्क साधावा: नवनिर्वाचित नगराध्यक्षांच्या पतींचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी)** कन्नड शहरातील नागरिकांनी आपल्याला भेडसावणाऱ्या कोणत्याही समस्यांबाबत २४ तासांत केव्हाही संपर्क साधावा, आम्ही तुमच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहोत, असे आवाहन नवनिर्वाचित नगराध्यक्षा शेख फरीन बेगम यांचे पती शेख जावेद शेख वाहेद यांनी शहरवासीयांना केले आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत कन्नडच्या जनतेने जो विश्वास दाखवला, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना शेख जावेद म्हणाले की, माझ्या पक्षावर आणि पत्नीवर शहरवासीयांनी विश्वास ठेवून त्यांना मोठ्या मताधिक्याने नगराध्यक्षा पदी निवडून दिले आहे. या विश्वासाला तडा जाऊ न देता, मी आणि माझी पत्नी शेख फरीन बेगम शहराच्या विकासासाठी आणि जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र कष्ट घेऊ.

**हरित कन्नडचा होणार कायापालट**

येणाऱ्या काळात कन्नड शहराचा पूर्णतः कायापालट करून 'सुंदर आणि स्वच्छ शहर' म्हणून त्याची नवी ओळख निर्माण करण्याचा आमचा मानस आहे. यासाठी मी आणि माझे सर्व सहकारी कामाला लागले असून, नियोजित विकासकामांद्वारे शहराचा चेहरामोहरा



बदलण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**थेट संपर्क साधण्याचे आवाहन**

शहरातील नागरिकांनी आपल्या नागरी समस्या, पाणी, रस्ते किंवा इतर कोणत्याही अडीअडचणींबाबत कोणताही संकोच न बाळगता थेट आमच्याशी संपर्क साधावा. जनतेच्या समस्यांचे निराकरण करणे हीच आमची प्राथमिकता असेल, असेही शेख जावेद यांनी स्पष्ट केले.

शेख जावेद यांनी दिलेल्या या खुल्या आव्हानामुळे आणि कामाच्या धडाक्यामुळे कन्नड शहरात सध्या सकारात्मक वातावरण पाहायला मिळत आहे.

# संस्कारयुक्त शिक्षणातूनच सक्षम पिढी घडवा - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** आजचा विद्यार्थी हा उद्याच्या समाजाचा कणा आहे. त्यामुळे केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात चांगले संस्कार, मानवी मूल्ये आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव रुजविणे ही काळाची गरज आहे. शिक्षक आणि पालकांनी एकत्रितपणे प्रयत्न करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

फुलंब्री येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात आयोजित तालुकास्तरीय **'महिला सक्षमीकरण व संवाद कार्यशाळेत'** ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.प्रमुख उपस्थितांची मांदियाळी या कार्यक्रमाला महसूल आणि शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. यात प्रामुख्याने नीलम बाफना (उपविभागीय अधिकारी),योगिता खटावकर (तहसीलदार),द्वारकाभाऊ पाथ्रीकर (संस्थेचे अध्यक्ष),राजेंद्र पाथ्रीकर (उपाध्यक्ष), उषाताई पाथ्रीकर (सचिव),गीतांजली पाथ्रीकर (जिल्हा परिषद सदस्य),अश्विनी लाठकर (माध्यमिक शिक्षणाधिकारी), जयश्री चव्हाण (प्राथमिक शिक्षणाधिकारी) उपस्थीत होते.

**१. गुणांच्या शर्यतीपेक्षा क्षमतेवर भर:**

शिक्षकांनी आपल्या पदाची प्रतिष्ठा ओळखून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. प्रत्येक विद्यार्थ्याकडून १००% गुणांची अपेक्षा करणे चुकीचे आहे. त्याऐवजी, विद्यार्थ्याची नैसर्गिक ओढ आणि क्षमता ओळखून त्याला विकसित करण्यावर भर द्यावा, असे स्वामी यांनी नमूद केले.

**२. स्पर्धा परीक्षांची तयारी:**

बदलत्या काळात स्पर्धा परीक्षांचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अगदी चौथी-पाचवीपासूनच या परीक्षांची ओळख करून देणे आवश्यक आहे. जेणेकरून भविष्यातील आव्हानांसाठी ते




सज्ज होतील.

**३. 'वाचाल तर वाचाल' उपक्रम:**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत बुक बँक आणि वाचाल तर वाचाल हे अभिनव उपक्रम राबविले जात असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. शाळा ही केवळ अभ्यासाची जागा नसून ती सकारात्मकता निर्माण करणारे केंद्र व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर यांनी केले.

त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन डॉ. सचिन मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गट शिक्षणाधिकारी क्रांती धसवाडीकर यांनी मानले.या कार्यशाळेला तालुक्यातील शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात झालेल्या या संवादामुळे उपस्थित महिला व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# पंचायत समिती सभापती निवडीचा बिगुल वाजला; १० मार्च रोजी होणार फैसला

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी**/सरफराज पटेल/ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर आता सत्तेच्या समीकरणांना वेग आला आहे. जिल्ह्यातील नऊ पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापती निवडीसाठी येत्या १० मार्च रोजी दुपारी २ वाजता विशेष सभांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी या संदर्भात अधिकृत आदेश निर्गमित केले असून, प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.निवड प्रक्रियेचे स्वरूपग्रामविकास विभागाने २० मार्चपूर्वी सर्व निवडी पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर ही प्रक्रिया पार पडत आहे.अर्ज प्रक्रिया: विशेष सभेच्या दोन तास आधी सभापती व उपसभापती पदासाठी उमेदवारी अर्ज स्वीकारले जातील.निवड क्रम: निर्धारित आरक्षणानुसार प्रथम 'सभापती' पदाची निवड होईल आणि त्यानंतर 'उपसभापती' पदासाठी प्रक्रिया राबवली जाईल.तालुकानिहाय आरक्षण आणि नियुक्त पीठासीन अधिकारीनिवड प्रक्रिया पारदर्शक पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तालुकानिहाय आरक्षणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.तालुका आरक्षण प्रवर्ग पीठासीन अधिकारी सोयगा व नागरिकांचा मागास प्रवर्ग एकनाथ बंगाळे सिल्लोड सर्व साधारण (महिला) निलेश अपार कन्नड सर्व साधारण (महिला) संतोष गोरड फुलंब्री सर्व साधारणनिलम बाफना खुलताबाद नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) सुचिता शिंदे वैजापूर अनुसूचित जाती (महिला) अरुण जऱ्हाड गंगापूर सर्वसाधारण विजय राऊत औरंगाबाद सर्व साधारण व्यंकट राठोड पैठण सर्वसाधारण (महिला) प्रवीण फुलारीराजकीय हालचालींना वेगया निवडी जाहीर होताच जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. विशेषतः फुलंब्री, सिल्लोड आणि पैठण या तालुक्यांमध्ये कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अनेक ठिकाणी महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगण्याची शक्यता असून, काही तालुक्यांत स्थानिक आघाड्या किंगमेकरच्या भूमिकेत असू शकतात. सभापती पदासाठी आरक्षणाची सोडत पाहता, इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली असून सदस्यांची पळवापळवी होऊ नये म्हणून 'सहली'चे नियोजनही सुरू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# मराठा लाईफ इन्फन्ट्री रेजिमेंटल सेंटरमध्ये माजी सैनिकांसाठी भरतीची सुवर्णसंधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/भारतीय सैन्य दलातील 'मराठा लाईफ इन्फन्ट्री रेजिमेंटल सेंटर'च्या अधिपत्याखाली माजी सैनिकांसाठी सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. या सेंटरमार्फत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येत असून, इच्छुक आणि पात्र माजी सैनिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने केले आहे.ही भरती प्रक्रिया प्रामुख्याने डिफेन्स सिक्युरिटी कोअर (DSC) अंतर्गत केली जाणार असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू आहेत.**उपलब्ध पदे:** जनरल ड्युटी (GD) आणि क्लर्क (Clerk).

**अनुभव:** ही भरती केवळ मराठा लाईफ इन्फन्ट्री (चडख) मध्ये सेवा बजावलेल्या माजी सैनिकांसाठीच मर्यादित आहे.

**किमान सेवा:** उमेदवाराने सैन्यात किमान ५ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.

**वैद्यकीय पात्रता:** उमेदवाराची वैद्यकीय वर्गवारी 'शेप-१' (SH-PE-1) असणे अनिवार्य आहे.

**चारित्र्य:** सैनिकी सेवेतील चारित्र्य 'उत्तम' (एशाश्रिरीू/तशीू त्रेव्र) असणे आवश्यक आहे. वय-भरतीसाठी वयाची अट खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.जीडी (GD) पदासाठी: जास्तीत जास्त ४६ वर्षांपर्यंत.**क्लर्क पदासाठी:** जास्तीत जास्त ४८ वर्षांपर्यंत.या भरती प्रक्रियेबाबत अधिक माहिती, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाची पद्धत जाणून घेण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाशी संपर्क साधता येईल.मराठा लाईफ इन्फन्ट्रीमध्ये सेवा बजावून निवृत्त झालेल्या जास्तीत जास्त माजी सैनिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# जनगणना प्रक्रिया अचूकतेसाठी प्रशिक्षणावर भर द्या; जिल्हाधिकारी दिलीप स्वामींचे आवाहन


**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** भारतीय जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीला आता वेग आला असून, या राष्ट्रीय कार्यात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी प्रशिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

जनगणनेचे कार्य हे अत्यंत जबाबदारीचे आणि महत्त्वाचे कार्य आहे. त्यामुळे प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संपूर्ण प्रक्रिया बारकाईने समजून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा चार्ज अधिकारी आणि जनगणना कर्मचाऱ्यांच्या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कालावधी: ४ मार्च ते ६ मार्च २०२६ (सकाळी ९:३० ते सायंकाळी ६:००),सहभागी संख्या: १६८ अधिकारी आणि कर्मचारी.,प्रशिक्षक: जनगणना संचालनालयातील उपनिबंधक वाय. एस. पाटील, पवन गोडे आणि राजवर्धन पाटील., एप्रिल २०२६ पासून जनगणनेचा श्रीगणेशा,भारतीय जनगणना २०२७ चा पहिला टप्पा एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे.



या टप्प्यात प्रामुख्याने घरांची यादी तयार करणे आणि घरांची गणना करणे ही कामे केली जाणार आहेत. हे काम तांत्रिकदृष्ट्या क्लिष्ट असल्याने क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या यंत्रणेला सक्षम करण्यासाठी या तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणात जिल्हयातील विविध विभागांचे प्रमुख आणि कर्मचारी उपस्थित आहेत, ज्यामध्ये प्रामुख्याने खालील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.महसूल विभाग: चार्ज अधिकारी (तहसिलदार), अतिरिक्त चार्ज अधिकारी (नायब तहसिलदार) आणि महसूल सहाय्यक,नगरपालिका व नगरपंचायत: मुख्याधिकारी, अतिरिक्त चार्ज अधिकारी आणि संबंधित लिपिक.

**नगररचना विभाग: विभागाचे तांत्रिक अधिकारी व कर्मचारी.**

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते आणि उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जनगणनेच्या कामात पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर आणि माहिती संकलनाच्या पद्धतींबाबत या सत्रात सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे.





## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे उद्या जालना दौऱ्यावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** राजस्थानचे राज्यपाल मा. श्री. हरिभाऊ बागडे हे शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते जालना येथील ज्येष्ठ नागरिक मंचाच्या वतीने आयोजित एका विशेष कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.



जिल्हा माहिती कार्यालयाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार, राज्यपालांचा अधिकृत दौरा कार्यक्रम खालीलप्रमाणे असेल:

दौरा वेळापत्रक: शुक्रवार, ६ मार्च २०२६

दुपारी २:५५ वाजता: राज्यपाल महोदयांचे छत्रपती संभाजीनगर येथून मोटारीने जेईएस (गएड) महाविद्यालय, जालना येथे आगमन होईल. आगमनानंतर काही वेळ राखीव ठेवण्यात आला आहे.

दुपारी ३:०० ते ४:०० वाजता: जालना ज्येष्ठ नागरिक मंचाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील आणि उपस्थितांशी संवाद साधतील.

**ज्येष्ठ नागरिक मंचाच्या कार्यक्रमाला लावणार हजेरी**

दुपारी ४:३५ वाजता: कार्यक्रम आटोपल्यानंतर ते जालना येथून पुन्हा छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

**प्रशासकीय तयारी पूर्ण**

राज्यपाल महोदयांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. जेईएस महाविद्यालय परिसर आणि कार्यक्रम स्थळी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात येणार आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ज्येष्ठ नागरिक मंचाचे पदाधिकारी या कार्यक्रमाच्या नियोजनात व्यस्त आहेत.

मूळचे याच भागातील असलेले हरिभाऊ बागडे सध्या राजस्थानचे राज्यपाल म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या दौऱ्यामुळे जालन्यातील ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## भविष्यातील आर्थिक स्थैर्यासाठी २० टक्के बचतीची सवय लावा; जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** बदलत्या काळानुसार केवळ पैसे कमावणे पुरेसे नसून, त्याचे योग्य नियोजन आणि गुंतवणूक करणे ही काळाची गरज आहे. भविष्यातील आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षिततेसाठी प्रत्येकाने आपल्या एकूण वेतनातील किमान २० टक्के रक्कम विविध योजनांमध्ये गुंतवून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.



जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे भारतीय डाक विभागाच्या डाक जीवन विमा (PLI), विविध बचत योजना, म्युच्युअल फंड आणि सायबर सुरक्षा या विषयावर आयोजित मार्गदर्शन कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

**गुंतवणूक: भविष्याची शिदोरी**

कार्यशाळेला संबोधित करताना जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, आर्थिक नियोजन हे कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सुरक्षितता आणि परतावा:** सरकारी योजनांमध्ये गुंतवणूक केल्यास सुरक्षिततेसोबतच चांगला परतावा मिळतो, ज्याचा फायदा कुटुंबाला संकटकाळात किंवा निवृत्तीनंतर होऊ शकतो.

**जोखीम आणि मोबदला:** ज्या गुंतवणुकीत जोखीम (ठळीज्ञ) जास्त असते, तिथे परतावा मिळण्याची शक्यताही जास्त असते, हे ओळखून कर्मचाऱ्यांनी समतोल गुंतवणूक करावी.

डाक विभाग व म्युच्युअल फंड तज्ज्ञांचे मार्गदर्शन

या कार्यशाळेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी शासकीय कर्मचाऱ्यांना सविस्तर तांत्रिक माहिती दिली.

**भारतीय डाक विभाग:** डाक जीवन विमा विकास अधिकारी संदीप महाजन यांनी डाक विभागाच्या योजनांची विश्वासार्हता आणि पारदर्शकतेवर प्रकाश टाकला. त्यांनी प्रामुख्याने खालील योजनांची माहिती दिली:

सुकन्या समृद्धी योजना (मुलींच्या भविष्यासाठी),सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (PPF),मुदत ठेव योजना (Fixed Deposit) आणि डाक जीवन विमा

म्युच्युअल फंड: एचडीएफसी (HDFC) म्युच्युअल फंडाच्या अधिकाऱ्यांनी बाजारपेठेवर आधारित गुंतवणुकीच्या संधी आणि 'एसआयपी'च्या (SIP) माध्यमातून दीर्घकालीन संपत्ती निर्मिती कशी करावी, याचे मार्गदर्शन केले.

**सायबर सुरक्षा:** सध्याच्या डिजिटल युगात आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी सायबर सुरक्षेचे नियम पाळणे किती महत्त्वाचे आहे, यावरही विशेष सत्र घेण्यात आले.

या कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध विभागांतील शासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित कर्मचाऱ्यांनी आपल्या शंकांचे निरसन करून घेऊन गुंतवणुकीच्या विविध पर्यायांची माहिती जाणून घेतली.






हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813